**डॉ. किरीट सोमैया** **भाजप राष्ट्रीय सचिव**
चार्टर्ड अकाउंटन्ट, पीएच.डी.
माजी खासदार

जुलै 5, 2011

**मुंबई लोकल बॉंबस्फोट 5 वा स्मृतीदिन-**
**दहशतवादी मोकळे/फरार आहेत, पीडित त्रास भोगत आहेत,**
**न्यायालयीन कारवाई अजून सुरू झालेली नाही**

-डॉ. किरीट सोमैया

11 जुलै 2006 रोजी मुंबईत 7 लोकल ट्रेन्समध्ये झालेल्या बॉंबस्फोटांना 5 वर्षे पूर्ण होत आहेत. दहशतवादी मोकळे/फरार आहेत, पीडित त्रास भोगत आहेत, न्यायालयीन कारवाई अजूनही सुरू झालेली नाही, असा आरोप भाजप नेता डॉ. किरीट सोमैया यांनी केला आहे. ही मोठी दुःखद बाब आहे, कि 5 वर्षांनंतर न्यायालयीन सुनावणी एका खालच्या पातळीवर म्हणजे मुंबई सत्र न्यायालयात नुकतीच सुरू झाली आहे. ज्या पद्धतीने सरकार तपास आणि कृती हाताळत आहे ते पाहता, सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निकालासाठी 2021 उजाडेल.
11 जुलैच्या बॉंबस्फोटातील पीडित एक साधा प्रश्न विचारत आहेत-
''11/7/2006 च्या दहशतवाद्यांना ही सौजन्याची, खास वागणूक कशाकरिता?''
11 जुलै 2006 रोजी मुंबईच्या 7 लोकल ट्रेन्समध्ये झालेल्या बॉंबस्फोटांनी मुंबईकराचे आयुष्य उध्वस्त केले आहे ज्यात 167 व्यक्ति मरण पावल्या आणि 890 जखमी झाल्या.
11/7/2006 च्या दहशतवादी हल्ल्याच्या न्यायालयीन कारवाईतील प्रचंड दिरंगाई आणि गोगलगायीच्या गतिने होणाऱ्या प्रगतीमुळे, 11/7/2006 च्या दहशतवादी हल्ल्याची शिकार झालेल्या व्यक्ति आणि त्यांची कुटुंबे केवळ मानसिक आघातच सहन करीत नाहीत तर, त्यानंतरच्या शस्त्रक्रिया आणि प्रदीर्घ वैद्यकीय उपचाराच्या त्रासही सहन करीत आहेत.
सर्वात दुःखदायक बाब म्हणजे 5 वर्षांनंतर-

- सर्वात खालच्या पातळीवर म्हणजे मुंबईच्या सत्र न्यायालयात न्यायालयीन कारवाई अजून सुरू झालेली नाही.
- 13 फरार आरोपी पाकिस्तानात आहेत.
- अंतिम शिक्षा फर्मावणे (सर्वोच्च न्यायालयात) 2021 पर्यंत पुढे जाईल.

डॉ. किरीट सोमैया यांच्या समवेत डझनभर पिडीत व्यक्तिंनीही आज मुंबईत प्रसारमाध्यमांसमोर आपल्या व्यथा मांडल्या. अजून अनेक पिडीत मानसिक धक्क्यातून सावरलेले नाहीत ही गोष्ट लक्षात घेणे भाग आहे. पाठोपाठच्या शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय उपचार अजून चालू आहेत.
पिडीत व्यक्तिंची अशी भावना आहे कि 26 नोंव्हेंबर 2008 च्या कसाबच्या दहशतवादी हल्ल्याचा न्यायलयाचा निकाल आला, कारण पिडीत व्यक्ति विदेशी होत्या आणि अमेरिका, इंग्लंड, इस्रायल यांचा दबाव होता. 2006 च्या पिडीत्यांच्या बाबतीत हा भेदभाव का?
डॉ. सोमय्या यांनी अशी माहिती दिली कि पिडीत व्यक्तिंनी, त्यांच्या व्यथा कानी घालण्यासाठी आदरणीय राष्ट्रपति आणि महाराष्ट्राचे आदरणीय राज्यपाल यांच्या भेटीसाठी विनंती केली आहे.
2006 च्या 5 व्या स्मृतीदिनानिमित्त माहिम स्टेशनवरील स्मारकापाशी आदरांजली वाहण्यात येईल.

***प्रसिद्धी सचिव***